<u>**नियमीत दिवाणी दावा क्रं. २०/२०२० मधील नि.क्रं. ११७ खालील आदेश**</u>

प्रस्तुत वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ४ व प्रमाणे दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा दावा वाटपासाठी, हक्कज्ञापनासाठी व कायम मनाई करीता दाखल केला आहे. वादी यांनी सदर अर्जान्वये मनाई अर्ज नि.क्रं. ५ वर दि. २०.०२.२०२३ रोजी या न्यायालयाने केलेल्या मनाई अर्जाच्या आदेशाचा पुर्नविचार करणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी क्रं. १-अ ते ३-अ, ४-ब व ५ तर्फे सदर अर्जास त्यांचे लेखी म्हणणे नि.क्रं. १२२ वर दाखल केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादीनी अर्जात नमुद केले प्रमाणे जैसे थे चा आदेश ठेवणेबाबत अर्ज दिला होता. सदरच्या अर्जामध्ये वादींनी अपिलाचे मुदतीपर्यंत जैसे थे बाबतचा आदेश मागणी केली होती. दि.२०.०२.२०२३ रोजी नि.क्रं. ५ वरील आदेश झाला आहे. सदर आदेशाबाबतची माहिती त्याच दिवशी वादींना मिळाली होती. त्यामुळे दि. २०.०३.२०२३ पर्यंत वादींनी अपिल करणे जरुरीचे होते. असे असताना वादींनी सदरच्या निर्णयावर वरिष्ठ कोर्टात अपिल दाखल केले नाही अथवा त्याबाबत नोटीस प्रतिवादी यांना मिळालेली नाही. त्यामुळे वादी यांचा सदरचा अर्ज कायद्याने चालणेस पात्र नाही अथवा वादी यांचे मागणी प्रमाणे मंजूर करण्याची कोणतीही तरतुद दिवाणी प्रक्रिया संहितेत नाही. त्यामुळे वादी यांचा सदरचा अर्ज रक्कम रु. ५०,०००/- खर्च प्रतिवादींना यांना देण्यात येऊन तो नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०३.** दोन्ही पक्षकारतर्फे युक्तीवाद ऐकला. दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हा वाटपासाठी, हक्कज्ञापनासाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. वादी यांनी नि.क्रं.५ प्रमाणे मनाई अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज गुणदोषावर चालून निकाली करण्यात आला. वादी यांचा सदरचा अर्ज नामंजूर करण्यात आला. त्यामुळे वादी यांना सदर अर्जावरील आदेशा विरुध्द वरिष्ठ न्यायालयात दाद मागणे क्रमप्राप्त होते. परंतु वादी यांनी तसे न करता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ४ प्रमाणे नि.५ वरील झालेल्या आदेशाचा पुर्नरविचार करावा म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादी यांच्या सदर अर्जावरील आदेशाला वरिष्ठ न्यायालयात आव्हानीत न करता कनिष्ठ न्यायालयानेच पर्नरविचार करावा असे कथन केले आहे. परंतु कनिष्ठ न्यायालयाचा आदेश कनिष्ठ न्यायालयालाच थांबवणेचा किंवा त्याच्या पुर्नरविचार करणेचा अधिकार प्राप्त होत नाही. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात आला आहे.

Digitally signed by V. A. Lavand-Kokate
Date: 2024.07.11 18:05:59 +0530
V. A. Lavand-Kokate

( व्ही.ए.लावंड-कोकाटे )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळे-खेरीवडे.

कळे-खेरीवडे
दि.११.०७.२०२४.